क्र. 17

दोन खिडक्या.

# कमी मार्क मिळालेच कसे?

पहिली खिडकी :

**बाबा :** काय रे रिझल्ट लागला का?

**समीर :** अं.. लागला..

**बाबा :** मग आल्यावर सांगितलं का नाहीस?

**समीर :** अं .. सांगणारच होतो..

**बाबा :** हो..पण सांगितलं नाहीस. मी विचारल्यावरच तुला कंठ फुटलाय. हो की नाही?

**समीर :** हो.. म्हणजे खरंच सांगणार होतो

**बाबा :** कधीचा मुहूर्त होता.. सांगायचा?

**समीर :** अं.. तसं नाही..

**बाबा :** काय झालं? गणितात किती पडले?

**समीर :** कमी पडले?

**बाबा :** का? किती कमी पडले?

**समीर :** थोडे कमी

**बाबा :** अरे नीट सांगशील की नाही? कमी..थोडे कमी.. याचा काय अर्थ लागणार मला? अं..?

**समीर :** मागच्या वेळेपेक्षा कमी पडले?

**बाबा :** का?

**समीर :** यावेळी पेपर खूप हार्ड तपासले

**बाबा :** म्हणजे मागच्यावेळी पेपर खूप सॉफ्ट तपासले म्हणून तुला दोन-तीन मार्क जास्त पडले होते का? कुठल्या अतीशहाण्याने सांगितलं तुला हे?

**समीर :** वर्गातली मुलं म्हणत होती

**बाबा :** व्वा! ते तुझे मित्र म्हणजे बेअक्कलच असणार.

**समीर :** अं..

**बाबा :** तुला एकूण किती मार्क मिळाले हे मला अजून कळलंच नाहीए.

**समीर :** अं.. मागच्यावेळी मला 60 होते..

**बाबा :** (रागाने ओरडत) अरे गधड्या यावेळी किती आहेत ते सांग

**समीर :** अं.. यावेळी मला 42 मिळाले.

**बाबा :** शाब्बास! आता पुढच्यावेळी 28 आणि नंतर भोपळाच की! चांगले पांग फेडताय आमचे. आम्ही फक्त फीया भरायच्या आणि तू अभ्यासाच्या नावाखाली मजा मारायची.

**समीर :** नाही बाबा..

**बाबा :** एक शब्द बोलू नकोस. तुला काय कमी केलं आम्ही? क्लास पाहिजे क्लास लावला. त्याच्या भरमसाठ फीया भरल्या. भरल्या की नाही?

**समीर :** हो

**बाबा :** अभ्यासाला नवीन टेबल पाहीजे? आणलं.
आणलं की नाही?

**समीर :** हो आणलं.

**बाबा :** नवीन पुस्तकं पाहीजेत? गाईड पाहिजेत? स्वाध्याय पाहिजेत?
तू जे जे सांगशील ते ते आणलं की नाही?

**समीर :** आणलं.

**बाबा :** क्लासला जायला उशीर होतो म्हणून नवीन सायकल आणली.
आणली की नाही?

**समीर :** हो आणली.

**बाबा :** मूर्खा, पैसे काय झाडावर लागतात का? वाट्टेल तेव्हढे पैसे तुझ्यासाठी खर्च केले. तू सांगितलेली प्रत्येक गोष्ट आणली.. मग तू मार्क का नाही आणत?

**समीर :** अं..मी अभ्यास केला होता..

**बाबा :** खोटं बोलू नकोस. अभ्यास केला होता तर मार्क कमी का पडले? इतके पैसे खर्च केले तरी तुझे मार्क न वाढता खालीच घसरत चाललेत. आता काय माझं रक्त ओतू तुझ्यावर..?

**समीर :** बाबा नका असं बोलू..

**बाबा :** मग काय बोलू? काय करू? का फक्त तुझ्यासारख्या बेअक्कल मुलावर पैसे उधळत राहू?
आम्ही कष्ट करून पैसे मिळवतो ते काय तुझी अधोगती पाहण्यासाठी? मग कशाला पाहिजेत ते खर्चीक क्लास आणि ती महागडी ढीगभर पुस्तक?

**समीर :** बाबा मी पुढच्यावेळी अधिक मार्क मिळवेन.

**बाबा :** तू काय मला मूर्ख समजलास की काय? मागच्यावेळी पण तू हेच बोलला होतास.. आठवतं?

**समीर :** हो. पण मी खरंच अभ्यास केला होता..

**बाबा :** आता माझा तुझ्या बोलण्यावर विश्वास नाही. आता तुला फटकवल्याशिवाय आणि तुझ्या सगळ्या इतर गोष्टी बंद केल्याशिवाय तुझे मार्क वाढणार नाहीत.

**समीर :** बाबा प्लीज माझं एकदा ऐका.. असं करू नका..

**बाबा :** मला शहाणपण शिकवण्याची गरज नाही. आत्तापासून मी सांगेन ती पूर्व दिशा. कळलंय? ती दारामागे ठेवलेली छडी घेऊन ये..

**समीर :** क..कशाला?

**बाबा :** कशाला? तुला प्रसाद द्यायचा आहे नं..छडी प्रसाद!
लगेच गुण येईल.

..............................................................................................

**दुसरी खिडकी :**

**बाबा :** काय रे रिझल्ट लागला का?

**समीर :** अं.. हो लागला.

**बाबा :** म.. आल्यावर सांगितलं का नाहीस?

**समीर :** सांगणारच होतो पण..

**बाबा :** पण गणितात मार्क कमी पडले म्हणून सांगायची लाज वाटली?

**समीर :** हो बाबा.

**बाबा :** अरे वेड्या असं लाजून कसं चालेल?

**समीर :** म्हणजे?

**बाबा :** समजा तू लाजेपोटी किंवा भितीपोटी मला मार्क सांगितले नाहीस तर ते वाढणार आहेत का?

**समीर :** नाही.

**बाबा :** म.. झालं तर.
अरे तुला किती मार्क कमी पडले हे जर कळलं तर आपल्याला पुढच्या गोष्टी ठरवता येतील.

**समीर :** (भित-भीत) म्हणजे तुम्ही मला मारणार? शिक्षा करणार?

**बाबा :** का बरं असं विचारतोयस?

**समीर :** माझा मित्र म्हणाला की 'त्याला कमी मार्क पडले हे कळल्यावर त्याचे बाबा त्याला मारतात'

**बाबा :** अरेव्वा! मारून जर मार्क वाढणार असतील तर मग मी पण बदडतो, झोडपतो की तुला.. काय?

**समीर :** पण मारून कसे मार्क वाढतील?

**बाबा :** खरंय. म्हणून तर मी तुला मारत नाही. आणि मारण्याने त्रास होतोच ना?

**समीर :** मुलांना..?

**बाबा :** फक्त मुलांनाच नाही तर पालकांनाही होतोच त्रास! पालक कितीही दुष्ट असले तरी आपल्या मुलांना मारणं कुठल्या पालकांना आवडेल रे? नंतर त्यांचं मन त्यांना खातंच की.
असो. किती मार्क पडले.

**समीर :** मला मागच्यावेळी गणितात 60 मार्क पडले होते पण यावेळी फक्त 42 मार्कच मिळाले.

**बाबा :** ओके. काही हरकत नाही. या परीक्षेमुळे आपल्याला समजलं की गणितातला कुठला भाग तुझा कच्चा आहे. आता त्याची तयारी अधिक करू.

**समीर :** पण कशी करणार? खूप अभ्यास करुन पण मला तो भाग समजलेलाच नाही.

**बाबा :** समीर एक लक्षात ठेव, अभ्यास कधी खूप नसतो, कमी नसतो आणि कधी तो संपत पण नाही. अभ्यास हा सतत सुरुच असतो.

**समीर :** म्हणजे? मला नाही कळलं. माझा गणितातील कच्चा भाग पक्का होण्यासाठी..

**बाबा :** खूप युक्त्या आहेत, अनेक मार्ग आहेत.
आपण एक आयडीया करू..

**समीर :** कोणती?

**बाबा :** गणितातला जो भाग तुला समजलेला नाही तो तू मला शिकवायचा..

**समीर :** बाबा, तुम्ही माझी गंमत तर करत नाही ना? जो भाग मला समजलाच नाही तो मी तुम्हाला कसा शिकवणार?

**बाबा :** हीच तर गंमत आहे समीर. तू जेव्हा मला शिकवायला लागशील तेव्हा त्यावर तू अधिक विचार करशील, वेगळा विचार करशील आणि त्यातूनच तुला रस्ता मिळेल.

**समीर :** आणि नाही रस्ता मिळाला तर..

**बाबा :** तर आपण दोघे मिळून प्रयत्न करू. आपल्याला ही नाही जमलं तर तुझ्या मित्रांना विचारू..
पण यातून मार्ग काढूच.

**समीर :** बाबा मला एक ग्रेट आयडिया सुचलीय. मला आणखी एक संधी द्या. मी मला अडलेले प्रश्न माझ्या मित्रांकडून, शिक्षकांकडून समजून घेतो आणि मग तुम्हाला शिकवतो.

**बाबा :** यामुळे काय होईल?

**समीर :** यामुळे चार गोष्टी होतील.

**बाबा :** ऑ त्या कोणत्या..?

**समीर :** माझी अडचणी मी स्वत:हून सोडवीन. तुम्हाला शिकवताना माझी आपोआप उजळणी होईल. त्यामुळे पुढच्या परीक्षेत मला जास्त मार्क मिळतील.

**बाबा :** शाब्बास समीर. पण या झाल्या तीन गोष्टी. चौथी कुठली?

**समीर :** 'मला मार्क कमी पडले तरी माझ्यावर न डाफरता मला धीर देणाऱ्या माझी चूक समजून घेऊन त्यातून पुढे जाण्याचा मार्ग दाखवणाऱ्या माझ्या बाबांचा मला अभिमान आहे' असं मी माझ्या मित्रांना सांगेन.

........................................................................

आपले पालक कुठल्या खिडकीत असावेत, असं मुलांना वाटत असेल? का असं वाटत असेल? त्यासाठी पालक म्हणून तुम्ही काही करता का?

मला कळवाल?

........................................................................

- राजीव तांबे

- rajcopper91@gmail.com